अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/ ६४३१
दिनांक :- १४/३/२०२०

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय :- **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत संशयित रुग्णाचे सर्वेक्षण करणेबाबत.

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५

वरील संदर्भाचे अनुषंगाने शहरात प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत संशयित रुग्णाचे सर्वेक्षण करण्याच्या दृष्टीने सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे गट (Team) तयार करण्यात येत आहे. त्याप्रमाणे सर्वसंबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यवाही करावी.

सर्व घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले अगर कसे याबाबत दक्षता घेऊन सर्वेक्षणातून कोणतेही घर सुटता कामा नये याची खबरदारी वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी घ्यावी व महापालिका सहायक आयुक्त यांचे मार्फत अहवाल सादर करावा.

सदरच्या कालावधीत या कामास नकार देणा-या / हलगर्जीपणा करणा-या व्यक्तींविरुद्ध संदर्भीय कायद्यान्वये कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

वरील आदेशान्वये हाती घेण्यात येत असलेल्या सर्व कामांच्या माहितीचे संकलन करून ती मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देण्याची कार्यवाही श्री.विलास कानडे, सह महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी करावयाची आहे व त्यांना याकामी डॉ.अमित शहा व डॉ.मदन बिरादार यांनी सहकार्य करावयाचे आहे.

Rubal
15/3/2020

**(रुबल अग्रवाल)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि) यांना माहितीस्तव.
प्रती –
संबंधीत मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका

E:\comp2\PMC NO 2\prabhune_1\KARYALAIN ADESH (from May 2018).doc